**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्य अभिसरण आराखडयाची अंमलबजावणी करणे बाबतच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०१४/प्र.क्र.३५/मग्रारो-१,
नियोजन (रोहयो) विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १५ डिसेंबर, २०१४

**संदर्भ**: १) नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०११/प्र.क्र. २८/रोहयो-१, दिनांक ९ मे, २०११

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१२/प्र.क्र.२०३/पापू-१६, दिनांक ६ डिसेंबर, २०१२

३) नियोजन (रोहयो)विभाग शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र. १२२/रोहयो-१ दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३

४) नियोजन (रोहयो)विभाग शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र. १४२/रोहयो-१ दिनांक ७ डिसेंबर, २०१३

५) नियोजन (रोहयो)विभाग शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र. १३७/रोहयो-१ दिनांक ४ मार्च,२०१४

६) केंद्र शासन, ग्रामीण विकास विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. J-11011/12/2014, MGNREGA-VII, दिनांक ३० मे, २०१४

७) शासनाचे पत्र क्र. मग्रारो-२०१४/प्र.क्र.३५/मग्रारो-१, दिनांक २६ जून, २०१४

८) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ ऑक्टोंबर, २०१४ रोजीचे बैठकीचे इतिवृत्त

९) आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपूर यांचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ चे पत्र

**शासन परिपत्रक :**

केंद्र शासनाने महात्मा गांधी नरेगा कायदा २००५ मधील अनुसूची-१ मध्ये बदल करून विविध विभागांसोबत योजनांचे अभिसरण (convergence) स्थापित करणेवर भर दिला आहे. त्यामुळे महात्मा गांधी नरेगा अंतर्गत इतर विभागाच्या योजनांशी अभिसरणाद्वारे विविध मत्तांची गुणवत्ता व उत्पादकता वाढीस लागणार आहे. तसेच राज्य शासनाच्या इतर विभागासोबत समन्वय वाढून दारिद्रय निर्मूलन दूर होण्यास मदत होणार आहे. यास्तव केंद्र शासनास संदर्भ क्र.७ येथील दिनांक २६ जुन, २०१४ च्या पत्रान्वये महात्मा गांधी नरेगा अंतर्गत राज्य अभिसरण योजनांचा आराखडा (State Convergence Plan) सादर करण्यात आला आहे व त्यास केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स समितीच्या दिनांक २८ ऑक्टोंबर, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत राज्य अभिसरण आराखडा मंजूर करण्यात आला आहे. मंजुर राज्य अभिसरण आराखडयानुसार कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

**१. राज्य अभिसरण योजनांच्या आराखाड्याचे स्वरूप:**

राज्य अभिसरण आराखड्यात निर्मल भारत अभियान, रेशीम उद्योग विकासाची योजना, राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन मिशन, IWMP, वृक्ष लागवड कार्यक्रम, राष्ट्रीय जीवन उपजिवीका अभियान(NRLM), विशेष घटक योजना/आदिवासी उपयोजना या योजनांचा समावेश करण्यात आला आहे. **याबाबत अधिक तपशील परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आला आहे.** समावेश केलेल्या योजनांपैकी वृक्ष लागवड योजना, राष्ट्रीय जीवन उपजिवीका अभियान, व सुक्ष्म पाणलोट विकास योजना या योजनांच्या बाबतीत १००% खर्च महात्मा गांधी नरेगा योजनेतुन करण्यात यावा व इतर विभागाकडुन फक्त तांत्रिक किंवा तत्सम प्रकारची सहकामे घेण्यात यावे.

**२. नियोजन व सनियंत्रण :**

जिल्हा स्तरावरील सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी जिल्हा स्तरीय समिती गठित करण्यात यावी. या समितीचे नाव "**जिल्हा अभिसरण सनियंत्रण समिती**" असे राहील. या समितीत खालील सदस्य राहतील.

१) जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक — अध्यक्ष
१) मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा सह-जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्हा परिषद - सह अध्यक्ष
२) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी
३) उप-संचालक, सामाजिक वनीकरण
४) जिल्हा रेशीम विकास अधिकारी
५) उप- मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
६) उप जिल्हाधिकारी (रोहयो) -------------------- सदस्य सचिव
७) राष्ट्रीय ग्रमीण उपजिवीका अभियानाचे जिल्हा समन्वयक
८) प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता
९) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१०) जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी
११) प्रकल्प अधिकारी, एकत्मिक आदिवासी विकास प्रकल्प

जिल्हा अभिसरण सनियंत्रण समितीने महिन्यातुन एकदा जिल्हा अभिसरण योजनेबाबत आढावा घ्यावा व त्याचा सविस्तर अहवाल तयार करून आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपुर यांना सादर करावा. तसेच आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपुर यांनी राज्याचा एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

**३. मार्गदर्शक सूचना:**

१) निर्मल भारत अभियान योजनेच्या अभिसरणातून दिनांक २ ऑक्टोबर २०१४ नंतर नवीन कामे हाती घेऊ नयेत. मात्र, दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पर्यन्तची भौतिक किंवा आर्थिक दृष्ट्या अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करावीत. ज्या कामांवर किमान १ हजेरीपत्रक निर्गमित झाले आहे, अशा कामांना अपूर्ण मानावे.

२) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत मोठ्या प्रमाणावर शेततळे व सिंचन विहिरीचे कामे पूर्ण झाली आहेत. मात्र, पाणी उपसण्याची सोय नसल्यामुळे सिंचनाचा लाभ शेतक-यांना घेता येत नाही. अशा लाभार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग तसेच विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमामध्ये कृषी विभागा मार्फत (VIIDP) सिंचन सुविधा पुरवण्यासाठी वैयक्तिक लाभ योजना (डिझेल किंवा विद्युत पंप सेट देणे) राबवल्या जातात. या योजनेचे निकष महात्मा गांधी नरेगा योजनेचे लाभार्थी पूर्ण करत असल्यास, त्यांना प्राधान्याने डिझेल किंवा विद्युत पंप संच पुरवण्यात यावेत. यासाठी महात्मा गांधी नरेगा योजनेमध्ये पुर्ण झालेल्या शेततळी व सिंचन विहिरींच्या पात्र लाभार्थींची यादी जिल्हा अभिसरण सनियंत्रण समिती मार्फत जिल्हास्तरीय महात्मा गांधी नरेगा यंत्रणेने संबंधित विभागास उपलब्ध करुन द्यावी व संबंधित विभाग म्हणजेच समाज कल्याण विभाग व आदिवासी विकास विभाग व कृषि विभाग यांनी त्यांचे निकषानुसार पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.

3) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन प्रकल्प (IWMP) अंतर्गत पाणलोट कामावर १००% उपचार पूर्ण होण्यासाठी महात्मा गांधी नरेगा योजनेत अनुज्ञेय कामे (प्रामुख्याने अकुशल कामे) हाती घेण्यात यावीत व उर्वरित कामांसाठी IWMP अंतर्गत प्राप्त होणारा निधी वापरण्यात यावा. **IWMP सोबत अभिसरण(convergence) करण्यासाठी जिल्हा अभिसरण सनियंत्रण समितीने किमान IWMP अंतर्गत कामे सुरू असलेल्या पाणलोट क्षेत्रात किमान २०० हेक्टर क्षेत्र निवडावे. सदर २०० हेक्टर क्षेत्र महात्मा गांधी नरेगा अंतर्गत उपचारासाठी हाती घेऊन काम पूर्ण करावे.** अशी निवड करताना महात्मा गांधी नरेगा अंतर्गत मजूर उपलब्ध होतील अशी गावे निवडावीत. IWMP अंतर्गत प्रकल्पासाठी अंमलबजावणी यंत्रणा (PIA) म्हणून काम करणा-या विभागाने महात्मा गांधी नरेगा अंतर्गत यंत्रणा म्हणून काम करावे.

४) ग्रामपंचायतींमार्फत एकात्मिक पद्धतीने पाणलोट विकासाची कामे घेण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३ नुसार स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहकार्याने सूक्ष्म पाणलोट विकास कार्यक्रम राबविणे बाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. या कार्यक्रमासाठी १००% खर्च हा महात्मा गांधी नरेगा अंतर्गत होणार असुन, कृषी विभागाकडुन तांत्रिक मदत घेण्यात यावी. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याची प्रमुख जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तर समितीची राहील. त्यांनी शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३ नुसार संस्थेची निवड करून कामांना गती द्यावी. **प्रत्येक जिल्हयांना ३१ मार्च,२०१४ अखेर २०० हेक्टर क्षेत्राचे उपचार पूर्ण करणे अनिवार्य राहील.**

५) इतर योजनांच्या बाबतीत संबंधित शासन निर्णय स्वयंस्पष्ट आहेत त्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

## ४. नोडल अधिकारी :

जिल्हा स्तरावर उप-जिल्हाधिकारी (रोहयो) यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तालुका स्तरावर तहसीलदार हे नोडल अधिकारी राहतील. विभागीय स्तरावर अधिक्षक कृषी अधिकारी (विभागीय) हे नोडल अधिकारी राहतील. राज्य स्तरावर उप-आयुक्त (कृषी), नरेगा आयुक्त कार्यालय, नागपुर यांनी नोडल अधिकारी म्हणून काम पहावे.

५. **MIS :**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागाने www.nrega.nic.in या संकेतस्थळावर **"Convergence"** ही लिंक उपलब्ध करून दिलेली आहे. या माध्यमातून अहवाल राज्य व केंद्र शासनाकडे सादर करावेत. याबाबत सर्व MIS समन्वयक यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. संकेतस्थळावर अचूक माहिती भरण्याची जबाबदारी MIS समन्वयक यांची राहील. सर्व विभागाकडून माहिती प्राप्त करून घेण्यासाठी परिशिष्ट- क मधील नमुने वापरावेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**सहपत्र: (परिशिष्ट-अ,ब,क)**

**(आर.विमला)**
**उप सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन**
15/12/2014

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव(रोहयो), मंत्रालय, मुंबई-३२
आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
आयुक्त (कृषी), कृषि आयुक्तालय, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
संचालक, फलोत्पादन, पुणे
आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई
प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
संचालक, भुजल विकास यंत्रणा विकास, पुणे
संचालक, सामाजिक वनीकरण,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

# परिशिष्ट-अ

| अ.क्र | विभाग | योजना | काम | महात्मा गांधी नरेगा अंतर्गत घ्याव्याची कामे/ तरतूद | मूळ विभागाने घ्यावयाची कामे / तरतूद | जिल्हानिहाय भौतिक उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम विकास विभाग | निर्मल भारत अभियान | वैयक्तिक शौचालय बांधकाम | रु. ५४००/- | रु. ४६००/- | आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये राज्यात एकूण १ लक्ष शौचालय पूर्ण करणे. **जिल्हा निहाय तपशील परिशिष्ट- ब नुसार** |
| २ | वस्त्रोद्योग | रेशीम विकास योजना | तुती व टसर लागवड | पत्रक्र.आयुक्तालय/ तां.स./७५८/२०१४ दिनांक२३-०४-२०१४ नुसार | | **जिल्हा निहाय तपशील परिशिष्ट - ब नुसार** |
| ३ | कृषी विभाग | राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन मिशन | फळबाग लागवड | पत्र क्र. मग्रारोहयो- २०१३/प्र.क्र.१४२/रोहयो-१ दिनांक ७ डिसेंबर, २०१३ नुसार | | अमरावती, वर्धा, नागपुर या ३ जिल्ह्यात प्रत्येकी ५० हेक्टर |
| ४ | कृषी विभाग | सुक्ष्म पाणलोट विकास | एकात्मीक पद्धतीने पाणलोट विकास | शासन निर्णय क्र.मग्रारोहयो- २०१३/प्र.क्र.१२२/मग्रारो-१ दिनांक २२/११/२०१३ नुसार; विभागाकडुन फक्त तांत्रिक सहभाग, १००% खर्च महात्मा गांधी नरेगा मधुन | | आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये २०० हेक्टर प्रती जिल्हा पूर्ण करणे |
| ५ | कृषी विभाग | IWMP | एकात्म्कि पद्धतीने पाणलोट विकास | अकुशल स्वरूपाची कामे | केंद्र शानाच्या सूचना दिनांक 11 ऑगस्ट, 2014 | आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये २०० हेक्टर प्रती जिल्हा पूर्ण करणे |
| ६ | सामजिक वनीकरण विभाग | वृक्ष लागवड योजना | रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड | विभागाकडुन फक्त तांत्रिक सहभाग, १००% खर्च महात्मा गांधी नरेगा मधुन | | राज्यात ८ लक्ष वृक्ष लागवड पूर्ण करणे. **जिल्हा निहाय तपशील परिशिष्ट - ब नुसार** |
| ७ | ग्राम विकास विभाग | राष्ट्रीय उपजिवीका अभियान | CFT | विभागाकडुन फक्त तांत्रिक सहभाग, १००% खर्च महात्मा गांधी नरेगा मधुन नरेगा मधुन | | मंजूर MoU प्रमाणे |
| ८ | सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग | विशेष घटक योजना, आदिवासी उप-योजना | सिंचन सुविधा पुरविणे (डिझेल किंवा विद्युत पंप संच पुरवणे) | संबंधित विभागाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनेनुसार | | प्रत्येक जिल्ह्यात महात्मा गांधी नरेगा योजनेतुन सिंचन विहीर किंवा शेत तळयाचे काम पूर्ण असलेले १०० लाभार्थी निवडावे |

## परिशिष्ट - ब

### जिल्हा अभिसरण आराखडा

| अ. क्र. | जिल्हा | काम | अभिसरण विभाग | महात्मा गांधी नरेगा अंतर्गत घ्यावयाची कामे | अभिसरण विभागाने घ्यावयाची कामे | कामाची संख्या | प्रति कामाचे मूल्य | महात्मा गांधी नरेगा अंतर्गत आर्थिक तरतूद | अभिसरण विभागाची आर्थिक तरतूद | निर्माण होणारे मनुष्य दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| 1 | नागपूर | वैयक्तिक शोचालय (IHHL) | ग्रामविकास विभाग | Plinth level पर्यंत बांधकाम व खोदकाम | उर्वरित बांधकाम | 2690 | 10,000 | 14526000 | 12374000 | 53800 |
| | वर्धा | | | | | 21229 | 10,000 | 114636600 | 97653400 | 424580 |
| | भंडारा | | | | | 5650 | 10,000 | 30510000 | 25990000 | 113000 |
| | गोंदिया | | | | | 2928 | 10,000 | 15811200 | 13468800 | 58560 |
| | चंद्रपूर | | | | | 5663 | 10,000 | 30580200 | 26049800 | 113260 |
| | गडचिरोली | | | | | 4672 | 10,000 | 25228800 | 21491200 | 93440 |
| | नाशिक | | | | | 1009 | 10,000 | 5448600 | 4641400 | 20180 |
| | अहमदनगर | | | | | 3383 | 10,000 | 18268200 | 15561800 | 67660 |
| | धुळे | | | | | 1350 | 10,000 | 7290000 | 6210000 | 27000 |
| | जळगाव | | | | | 4688 | 10,000 | 25315200 | 21564800 | 93760 |
| | नंदुरबार | | | | | 698 | 10,000 | 3769200 | 3210800 | 13960 |
| | पुणे | | | | | 1297 | 10,000 | 7003800 | 5966200 | 25940 |
| | सातारा | | | | | 4818 | 10,000 | 26017200 | 22162800 | 96360 |
| | सांगली | | | | | 3395 | 10,000 | 18333000 | 15617000 | 67900 |
| | सोलापूर | | | | | 1746 | 10,000 | 9428400 | 8031600 | 34920 |
| | कोल्हापूर | | | | | 1 | 10,000 | 5400 | 4600 | 20 |
| | औरंगाबाद | | | | | 5201 | 10,000 | 28085400 | 23924600 | 104020 |
| | जालना | | | | | 8431 | 10,000 | 45527400 | 38782600 | 168620 |
| | परभणी | | | | | 5503 | 10,000 | 29716200 | 25313800 | 110060 |
| | हिंगोली | | | | | 1287 | 10,000 | 6949800 | 5920200 | 25740 |
| | नांदेड | | | | | 3808 | 10,000 | 20563200 | 17516800 | 76160 |
| | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बीड | | | | | 999 | 10,000 | 5394600 | 4595400 | 19980 |
| | लातूर | | | | | | | | | |
| | उस्मानाबाद | | | | | 3977 | 10,000 | 21475800 | 18294200 | 79540 |
| | अमरावती | | | | | 1337 | 10,000 | 7219800 | 6150200 | 26740 |
| | बुलढाणा | | | | | 11552 | 10,000 | 62380800 | 53139200 | 231040 |
| | वाशिम | | | | | 2978 | 10,000 | 16081200 | 13698800 | 59560 |
| | अकोला | | | | | 239 | 10,000 | 1290600 | 1099400 | 4780 |
| | यवतमाळ | | | | | 1182 | 10,000 | 6382800 | 5437200 | 23640 |
| | ठाणे | | | | | 10473 | 10,000 | 56554200 | 48175800 | 209460 |
| | रायगड | | | | | 4633 | 10,000 | 25018200 | 21311800 | 92660 |
| | रत्नागिरी | | | | | 220 | 10,000 | 1188000 | 1012000 | 4400 |
| | सिंधुदुर्ग | | | | | 949 | 10,000 | 5124600 | 4365400 | 18980 |
| 2 | बीड | तुती व टसर लागवड (रेशीम विकास योजना) | वस्त्रोद्योग विभाग (मध्यवर्ती रेशीम मंडळ) | खड्डे खोदणे, मजुरीचा घटक, लागवड आणि पीक संरक्षण | लागवड साहित्य (तुती रोपे) सेंद्रीय खते | 1765 | 10,000 | 9531000 | 8119000 | 35300 |
| | जालना | | | | | 150 एकर | 176306 | 26445900 | 1057500 | 42300 |
| | औरंगाबाद | | | | | 150 एकर | 176306 | 26445900 | 1057500 | 42300 |
| | | | | | | 150 एकर | 176306 | 26445900 | 1057500 | 42300 |
| 3 | नागपूर | फळबाग लागवड सुक्ष्म सिंचनाच्या सोईसह | कृषी विभाग (विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम) | फळबाग लागवड सुक्ष्म सिंचनाच्या सोईसह | तांत्रिक मार्गदर्शन | 50 हे. | 208464 | 10423200 | 0 | 21650 |
| | वर्धा | | | | | 50 हे. | 208464 | 10423200 | 0 | 21650 |
| | अमरावती | | | | | 50 हे. | 208464 | 10423200 | 0 | 21650 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | या योजनांसाठीचे लक्षांक सर्व जिल्हयांना समान असल्यामुळे दिलेले लक्षांक सर्व जिल्हयांना लागू आहेत. | सिंचन सुविधा पुरविणे (डीझल किंवा विद्युत पंप संच पुरवणे) | सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग विशेष घटक योजना, आदिवासी उप-योजना) **कृषी विभाग (विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम)** | विहिरीचे बांधकाम/ शेततळी | सिंचन सुविधा पुरविणे (डीझल किंवा विद्युत पंप संच पुरवणे) | 100 प्रति जिल्हा | 24000 | महात्मा गांधी नरेगा मधून पुर्ण झालेल्या विहीरी | 2400000 | |
| 5 | या योजनांसाठीचे लक्षांक सर्व जिल्हयांना समान असल्यामुळे दिलेले लक्षांक सर्व जिल्हयांना लागू आहेत. | एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन प्रकल्प | कृषि विभाग | पाणलोट क्षेत्रात दगडी बांध सलग समतल चर, शेततळे, बांधबंदिस्ती इ.अकुशल स्वरुपाची का | पाणलोट क्षेत्रातील उर्वरित कामे (DP नुसार) | 200 हेक्टर (किमान दोन पाणलोटा साठीचे नियोजन असणे आवश्यक) प्रति जिल्हा | 12000 प्रति हेक्टर | 1056000 | 1344000 | 6285 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | या योजनांसाठी चे लक्षांक सर्व जिल्हयांना समान असल्यामुळे दिलेले लक्षांक सर्व जिल्हयांना लागू आहेत. | रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड | सामाजिक वनीकरण विभाग | खड्डे खोदणे, वृक्ष लागवड करणे, संरक्षण | विभागाच्या रापवाटीकेतून आवयश्क रोपांचा लागवडीकरिता पुरवठा करणे | किमान 50 किमी प्रति जिल्हा | 415818 प्रति किमी | 20790900 | निरंक | 36500 |
| 7 | या योजनांसाठी चे लक्षांक सर्व जिल्हयांना समान असल्यामुळे दिलेले लक्षांक सर्व जिल्हयांना लागू आहेत | एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन प्रकल्प | कृषि विभाग | पाणलोट क्षेत्रात दगडी बांध सलग समतल चर, शेततळे, बांधबंदिस्ती इ. | एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन प्रकल्प मधील तांत्रिक मनुष्य बळाची यादी पुरविणे. | 200 हेक्टर (किमान पाच पाणलोटा साठीचे नियोजन असणे आवश्यक) | 12000 प्रति हेक्टर | 2400000 | निरंक | 14285 |
| 8 | यवतमाळ, अमरावती, वाशिम, ठाणे, नाशिक, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद | समूह सुविधा चमू (CFT) | राष्ट्रीय जीवनोन्नती अभियान | योजनेतील मजुर आराखडा बजेट आणि MoU मधील कृती आराखडा नुसार | | | | | | |

# परिशिष्ट - क

| अ.क्र | विभाग | योजना | काम | भौतिक उद्दिष्ट | मागील महिन्या पर्यंत साध्य (भौतिक, आर्थिक) | अहवाल महिन्यात साध्य (भौतिक, आर्थिक) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |